# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४

## प्रकटन

**विषय : जून-जुलै २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) पुरवणी परीक्षेचा निकाल जाहीर करणेबाबत...**

---

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत **माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) पुरवणी परीक्षा दिनांक २४ जून, २०२५ ते दिनांक ०८ जुलै, २०२५ व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) ची पुरवणी परीक्षा दिनांक २४ जून, २०२५ ते १६ जुलै, २०२५ या कालावधीत** आयोजित करण्यात आली होती.

सदर परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात येत असून निकालाची कार्यपध्दती व त्याच्या कार्यवाहीचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

१) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या नऊ विभागीय मंडळांमार्फत **जून-जुलै २०२५** मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) पुरवणी परीक्षेचा ऑनलाईन निकाल पुढील संकेतस्थळांवर **मंगळवार, दिनांक २९/०७/२०२५ रोजी दुपारी ०१.०० वाजता** जाहीर करण्यात येत आहे.

| उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा | माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा |
|---|---|
| **https://www.mahahsscboard.in** | **https://www.mahahsscboard.in** |
| **http://hscresult.mkcl.org** | **http://sscresult.mkcl.org** |

२) ऑनलाईन निकालानंतर लगेचच दुसऱ्या दिवसापासून माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) पुरवणी परीक्षेस प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यास स्वत:च्या अनिवार्य विषयांपैकी (श्रेणी विषयांव्यतिरिक्त) कोणत्याही विशिष्ट विषयात त्याने संपादित केलेल्या गुणांची गुणपडताळणी व उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती, पुनर्मूल्यांकनासाठी संबंधित विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पध्दतीने **https://www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांना स्वत: अर्ज करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. यासाठी आवश्यक अटी/शर्ती व सूचना संकेतस्थळावर देण्यात आलेल्या आहेत. **गुणपडताळणी व छायाप्रतीसाठी बुधवार, दिनांक ३०/०७/२०२५ ते शुक्रवार, दिनांक ०८/०८/२०२५ पर्यंत अर्ज ऑनलाईन पध्दतीने करता येईल.** त्यासोबतच ऑनलाईन पध्दतीने शुल्क (Debit Card/ Credit Card/ UPI/ Net Banking) याद्वारे भरता येईल.

३) जून-जुलै २०२५ पुरवणी परीक्षेच्या उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकनासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्यासाठी मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरुन प्रथम उत्तरपत्रिकेची छायाप्रत घेणे अनिवार्य असून छायाप्रत मिळाल्याच्या दिवसापासून त्यापुढील कार्यालयीन कामाच्या पाच दिवसांत पुनर्मूल्यांकनाच्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन विहित नमुन्यात विहित शुल्क भरुन संबंधित विभागीय मंडळाकडे विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक राहील. ज्या विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकन करावयाचे असेल त्यांनी अधिक माहितीसाठी संबंधित विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा.

SHS-11011/12/2025-EXM

1/1345480/2025


| Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004. | | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, स.न.८३२ ए, फा.प्लॉ.नं.१७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-४११००४ | |
|---|---|---|---|

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 I EPABX -25705000 I
Email : secretary.stateboard@gmail.com


जा. क्र.रा.मं./परीक्षा-२/२६५१
पुणे-४११००४
दिनांक:२८/०७/२०२५

प्रति,

१) मा. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-४०००३२
२) मा. विभागीय प्रसिध्दी उपसंचालक, पुणे/नागपूर/छत्रपती संभाजीनगर/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/कोकण
३) मा.संचालक, दूरदर्शन केंद्र, वरळी, मुंबई-४०००३०
४) मा.संचालक, आकाशवाणी, मुंबई केंद्र नवीन प्रसारण भवन, बॅकबे रेक्लेमेशन, आमदार निवासाजवळ, मुंबई-४०००२०
५) मा.संचालक, आकाशवाणी केंद्र, पुणे/नागपूर/ छत्रपती संभाजीनगर/मुंबई/जळगांव/ रत्नागिरी/सांगली/कोल्हापूर/सातारा/ सोलापूर/नाशिक
६) सर्व जिल्हा प्रसिध्दी अधिकारी
७) मा. संपादक, सर्व वृत्तवाहिन्या, वृत्तपत्रे

**विषयः- जून-जुलै २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) पुरवणी परीक्षेचा निकाल व विविध तपशील जाहीर करणेबाबत.**

**महोदय,**

जून-जुलै २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) पुरवणी परीक्षेचा निकाल जाहीर करणेबाबतच्या प्रकटनाची प्रत सोबत जोडली आहे.

सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील वृत्तपत्र, वृत्तवाहिन्या, आकाशवाणी व दूरदर्शन केंद्रांनी बातम्यांचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
Digitally signed by
Devidas Balkrishna Kulal
Date: 28-07-2025
16:15:27
सचिव,
राज्य मंडळ, पुणे - ०४

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१) विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे/नागपूर/ छत्रपती संभाजीनगर /मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/कोकण विभागीय मंडळ, पुणे/नागपूर/ छत्रपती संभाजीनगर /मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/रत्नागिरी यांनी स्थानिक स्तरावर प्रकटन प्रसिध्द करावे व सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांच्या निदर्शनास आणावे.
२) व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्य मंडळ, पुणे
३) अस्त्रास, १ व २ राज्य मंडळ, पुणे
४) ऑनलाईन विभाग, राज्य मंडळ, पुणे

**प्रत माहितीसाठी सविनय सादर-**

१) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२) मा. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, शिक्षण आयुक्त कार्यालय, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१

४) जून-जुलै २०२५ च्या इ. १० वी व इ. १२ वी परीक्षेमध्ये सर्व विषयांसह प्रथम प्रविष्ट होऊन उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांची संपादणूक सुधारण्यासाठी **श्रेणी/गुणसुधार** (Class Improvement Scheme) योजनेअंतर्गत परीक्षेस प्रविष्ट होण्यासाठी तरतुदींच्या अधीन राहून लगतच्या तीन संधी (फेब्रुवारी-मार्च २०२६, जून-जुलै २०२६ व फेब्रुवारी-मार्च २०२७) उपलब्ध राहतील.

५) फेब्रुवारी-मार्च २०२६ मधील माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस ज्या विद्यार्थ्यांना प्रविष्ट व्हावयाचे आहे अशा नियमित, पुनर्परिक्षार्थी विद्यार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी तसेच श्रेणीसुधार योजनेअंतर्गत प्रविष्ट होणारे व ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्था) द्वारे Transfer of Credit घेणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने स्विकारली जातील. त्याच्या तारखा मंडळामार्फत स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येतील.

Digitally signed by
Devidas Balkrishna Kulal
Date: 28-07-2025
16:11:58

दि. २८/०७/२०२५

सचिव,
राज्य मंडळ, पुणे-०४.

---

जा.क्र.पुविमं/माध्यमिक–क/उमा–अ/6547
पुणे –४११००५
दि.२८/०७/२०२५

प्रती,
मुख्याध्यापक / प्राचार्य
सर्व मान्यताप्राप्त शाळा /कनिष्ठ महाविद्यालय
जिल्हा– पुणे/अहमदनगर/सोलापूर,

उपरोक्त राज्यमंडळाच्या पत्राच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी सदर माहिती सर्व कनिष्ठ महाविद्यालयांनी आपल्या सूचना फलकावर लावून विदयार्थी व पालकांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

28.7.25

( डॉ.मीनाक्षी राऊत )
विभागीय सचिवांकरीता
पुणे विभागीय मंडळ, पुणे